**वाचले** :

१. उप आयुक्त,आकाशचिन्ह व परवाना विभाग यांचेकडील कारणे दाखवा नोटीस क्र.आप/६/कावि/२४१/२०२४ दि-१३/०६/२०२४

२. श्रीमती अश्वमेघा अनिल वडागळे,लिपिक यांचा दि.१४/०६/२०२४ रोजीचा खुलासा.

३. उप आयुक्त, आकाशचिन्ह व परवाना विभाग यांचेकडील पत्र.क्र.आप/६/कावि/२४५/२०२४ दि-१८/०६/२०२४

४. मा.आयुक्तसो.यांचा दिनांक. २६/०६/२०२४ रोजीचा मंजुर प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८,सामान्य प्रशासन विभाग,
क्र.साप्रवि/०९/कावि/ ४५० /२०२४
दिनांकः- २६/०६/२०२४

**विषय : सेवानिलंबीत करुन विभागीय चौकशी सुरु करण्याबाबत...**
**श्रीमती अश्वमेघा अनिल वडागळे,लिपिक**

**आदेश,**

**ज्याअर्थी, श्रीमती अश्वमेघा अनिल वडागळे** ह्या आकाशचिन्ह व परवाना विभागामध्ये **लिपिक** या गट-क दर्जाच्या पदावर कार्यरत आहेत. कार्यालयीन कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने त्यांच्याकडे पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील उद्योगधंदा, व्यवसाय व साठा परवाना देणे, नुतनीकरण करणे इत्यादी, विभागातील उदयोगधंदा विषयक संपूर्ण कामकाज सोपविण्यात आलेले आहे. त्यानुसार नेमुन दिलेले कामकाज सचोटीने कार्यतत्परतेने व प्राधान्याने नियमानुसार करणे अपेक्षित व अभिप्रेत आहे.

**आणि ज्याअर्थी,** उप आयुक्त, आकाशचिन्ह व परवाना विभाग यांनी वाचले क्र ३ च्या पत्रान्वये श्री. सब्बार मोहम्मद हसन चौधरी यांचे मे. अदीबा ट्रेडर्स, श्री. मोहमद बरकतुल्लाह यांचे मे.इब्राहिम स्क्रॅप सेंटर, श्री. स्वप्रिल अशोक सुर्यवंशी यांचे मे. सुर्यकिरण एंटरप्रायजेस श्री. दिनेश हसनथ गुप्ता यांचे मे. आदित्य इंटरप्रायजेस यांचे अर्जावर कार्यवाही करतांना आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करून प्रकरण वरिष्ठांकडे सादर करणे अपेक्षित असताना श्रीमती वडागळे यांनी कागदपत्राची नियमानुसार पुर्तता करून न घेता अधिकाराचा दुरूपयोग करून स्वत:च्या सहीने नवीन उद्योगधंदा परवाना निर्गत केल्याची बाब निदर्शनास आणून दिलेली आहे.

**आणि ज्याअर्थी**,उदधृत प्रकरणी उप आयुक्त, आकाशचिन्ह व परवाना विभाग यांनी श्रीमती अश्वमेघा अनिल वडागळे, लिपिक यांना वाचले क्र. १ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजाविणेत आली असता त्यांनी वाचले क्र. २ अन्वये, सादर केलेल्या खुलाशामध्ये, मानसिक स्थिती बरोबर नसल्याने मे. अदीबा ट्रेडर्स व इतर -३ यांचे प्राप्त उद्योगधंदा परवानाच्या प्रकरणावर नियमानुसार कार्यवाही करणे अपेक्षित असतांना अनावधानाने माझ्यांकडून चुक झाल्याचे मान्य केले आहे. प्रकरणी उप आयुक्त, आकाशचिन्ह व परवाना विभाग यांनी वाचले क्र ३ च्या पत्रान्वये श्रीमती वडागळे यांनी केलेल्या खुलासा संयुक्तीक नसल्याने तो अमान्य करून पुढील कार्यवाही करणेबाबत कळविलेले आहे.

**आणि ज्याअर्थी, श्रीमती अश्वमेघा अनिल वडागळे,लिपिक** यांनी अनअधिकाराने स्वत:च्या फायदा होण्याच्या दृष्टीने स्वत:च्या सहीने उद्योगधंदा परवाना निर्गत करून गंभीर गैरवर्तन केलेले आहे.त्यांनी नेमुण दिलेल्या कर्तव्यात नितांत सचोटी व कर्तव्यपरायणता न राखता, उदधृत गंभीर स्वरुपाचे वर्तन करून मनपाची जनमानसातील प्रतिमा मलिन केलेली आहे.एकंदरीत त्यांची सचोटी अत्यंत संशयास्पद असून त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील ३(१)(एक)(दोन)(तीन) मधील अर्थातर्गत तरतूदीचा भंग केलेला असून त्यांचे गैरवर्तनामुळे कार्यालयीन शिस्तीवर गंभीर प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव असल्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेलो आहे.

**त्याअर्थी,**मी आयुक्त,पिंपरी चिंचवड महानगरपालिका,उदघृत अशोभनीय गैरवर्तना प्रकरणी **श्रीमती अश्वमेघा अनिल वडागळे,लिपिक** हे प्रत्यक्ष सेवेत राहिल्यास, तपासात अडथळा निर्माण होण्याचा संभव असल्याने,उपलब्ध पुराव्यात फेरफार करण्यास कोणत्याही प्रकारे वाव मिळणार नाही,यास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५६ (१),५६(२)(फ़) नुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ४ (१) (अ) चे अर्थांतर्गत तरतुदीनुसार **श्रीमती अश्वमेघा अनिल वडागळे,लिपिक यांना** प्रस्तुत आदेशाचे दिनांकापासून तात्काळ सेवानिलंबीत करण्यात येत असून,त्यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ नियम ८ नुसार विभागीय चौकशी सुरु करण्यास मान्यता देत आहे. निलंबन कालावधीत **श्रीमती अश्वमेघा अनिल वडागळे,लिपिक** यांना पुढील अटी शर्तींच्या अधीन निर्वाह भत्ता अदा करण्यात येईल.

१. त्यांना सेवानिलंबनाच्या पहिल्या ३ महिने कालावधीसाठी अर्धवेतनी रजेवर असतांना जितके रजा वेतन मिळाले असते त्या रजा वेतनाइतकी निर्वाहभत्त्याची रक्कम आणि त्या व्यतिरिक्त अशा रजा वेतनावर आधारित महागाई भत्ता व त्यावर आधारित अर्जित रजेच्या काळात अनुज्ञेय असलेले भत्ते त्या प्रमाणात उपजिवीका भत्ता म्हणून देण्यात येईल.

२. ३ महिन्यानंतर त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियम ६८ मधील तरतुदीनुसार मूळ पगाराच्या ३/४ (तीन चतुर्थांश) अधिक अर्जित रजेच्या काळात अनुज्ञेय असलेले भत्ते मिळून होणारी रक्कम उपजिवीका भत्ता म्हणून देणेत येईल.

३. सेवानिलंबन काळात त्यांना अन्य कोणत्याही ठिकाणी नोकरी अगरं अन्य कोणताही व्यवसाय करता येणार नाही.

४. दरमहा उदरनिर्वाह भत्ता मिळणेकामी त्यांनी अन्य कोणत्याही ठिकाणी सेवा, नोकरी, व्यवसाय केला नाही असा दाखला दरमहा २० तारखेच्या आत स्वत:च्या सहीने **आकाशचिन्ह व परवाना विभाग** येथे दिला पाहिजे, म्हणजे पुढील महिन्याचे एक तारखेस त्यांना उदरनिर्वाह भत्ता देण्यात येईल. दर महिन्याचे २० तारखेपर्यंत दाखला हजर न केल्यास उदरनिर्वाह भत्ता अदा केला जाणार नाही व भत्ता अदा करणेस विलंब झाल्यास त्यास महापालिका जबाबदार राहणार नाही.

५. सेवानिलंबन काळात त्यांनी कार्यालयात अगर कार्यालयाचे आवारात गैरवर्तन केल्याचे आढळून आल्यास ते त्यांचे गंभीर गैरवर्तन समजण्यात येऊन त्याबाबत त्यांचेविरुध्द पुढील शिस्तभंगाची अलहिदा कारवाई केली जाईल.

६. निलंबन काळात त्यांचे मुख्यालय पिंपरी असे राहिल. त्यांना वरिष्ठांचे परवानगीशिवाय मुख्यालय सोडून जाता येणार नाही.

७. प्रस्तुत आदेशाची नोंद त्यांच्या सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थापना ११/१०/८२ पिंपरी-४११०१८

(राहुल महिवाल) ८-६-२४
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

प्रति,

**श्रीमती अश्वमेघा अनिल वडागळे,लिपिक, आकाशचिन्ह व परवाना विभाग.**

प्रत,

१. <u>आकाशचिन्ह व परवाना विभाग</u>

२/- प्रस्तुत आदेश संबंधितांस बजाविण्यात येवुन त्यांची स्वाक्षांकित पोहोच तात्काळ सादर करावी. व विभागीय चौकशीकामी १५ दिवसांच्या आत दोषारोपपत्र दाखल करावे. **तसेच श्रीमती वडागळे यांनी सद्या केलेल्या उद्योगधंदा परवान्याच्या प्रकरणाची संपुर्ण शहानिशा करून रद्द करण्याची कार्यवाही विभागस्तरावर नियमानुसार करावी व तसा अनुपालन अहवाल सादर करावा.**

१. टेबल क्र ४, १२, १४,२२, सामान्य प्रशासन संगणक कक्ष.

D:\VJ\2024\श्रीम.अश्वमेघा वडागळे,लिपिक.doc2